(२३८) DT 27/6/23 2:50

# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

**दिनांक : २६/०६/२०२३**

## प्रसिध्दी पत्रक (प्रेसनोट)

महाराष्ट्र राज्यातुन प्रसारीत होणा-या नवभारत, नवराष्ट्र या वृत्तपत्रसमुहातर्फे आयोजित पर्यावरणाविषयी उत्कृष्ट कामगिरी केलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांचा सन्मानसोहळयामध्ये मा. केंद्रीय मंत्री, रस्ते वाहतुक व महामार्ग, श्री. नितीन गडकरी यांचेहस्ते उल्हासनगर महानगरपालिकेस पारितोषिक देवून गौरविण्यात आले. सदरचा पारितोषिक वितरण सोहळा मुंबई, कफ परेड येथील ताज प्रेसिडन्ट याठिकाणी दिनांक २३/०६/२०२३ रोजी आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमामध्ये उल्हासनगर महानगरपालिकेच्या वतीने मा. आयुक्त अजिज शेख, उपायुक्त, डॉ. सुभाष जाधव यांनी मा. मंत्री महोदयांच्याहस्ते पारितोषिक स्विकारले.

उल्हासनगर महानगरपालिकेस केंद्र सरकारच्या केंद्रीय वने, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालयातर्फे राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रम (NCAP) तसेच १५ वा वित्त आयोगाअंतर्गत वर्ष २०१९-२० व २०२०-२१ करीता (NCAP) अंतर्गत रू.२.१० कोटी निधी प्राप्त झाला आहे. त्याचप्रमाणे १५ वा वित्त आयोगाअंतर्गत (Air Quality Improvement) करीता वर्ष २०२०-२१ ते २०२२-२३ पर्यंत एकुण रू.२५.०० कोटी निधी प्राप्त झाला आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार उल्हासनगर शहरातील हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी १. ०२ पावर डस्ट स्विपिंग मशिन खरेदी करणे,२. ०२ मिस्ट स्प्रे मशिन खरेदी करणे, ३. डंम्पिंग ग्राऊंड तसेच ट्रॅफिक सिग्नलवर सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे ४. शहरातील चौकांमधील कारंजांची देखभाल/दुरुस्ती करणे ५.रस्त्यांवरील चौकांमध्ये Verticle Garden तयार करणे ६.नागरीकांना हवेची गुणवत्ता समजण्यासाठी फलक प्रसिध्द करणे,६. महापालिका मालकीच्या इमारतींवर सोलर रुफ टॉप ग्रिड प्रणाली उभारणे ७. नविन रस्ते तयार करणे ८. रस्त्यांवरील खडडे भरणे, ९. कंपोस्ट पिट तयार करणे १०. CNG based Crematorium तयार करणे, ११. Animal Incineration मशिन बसवुन मृत प्राण्यांचे अवशेष नष्ट करणे १२. शहरातील नागरीकांसाठी २० इलेक्ट्रीक बसेसची खरेदी करून बससेवा सुरु करणे, वृक्ष लागवड करणे, नागरीकांमध्ये जनजागृती करणे अशी विविध कामे हाती घेण्यात आली असुन त्यापैकी काही कामे पुर्ण झाली आहेत व उर्वरित कामे प्रगतीपथावर सुरु आहेत.

देशभरातील सर्व राज्यांमधील शहरांपैकी (वर्ष २०१७-२०१८) च्या तुलनेत (वर्ष २०२१-२०२२) मध्ये उल्हासनगर शहरातील हवेची गुणवत्ता (PM१०) १५५ वरून ७७ म्हणजे ५०टक्के कपात झाल्याचे केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या अहवालात दर्शविण्यात आले होते. तसेच देशभरातील सर्व शहरांमधून हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी सर्वोत्तम कामगिरी करणा-या ११ शहरांमध्ये उल्हासनगर शहर दुस-या क्रमांकावर असल्याची नोंद घेण्यात आली होती. त्याचप्रामणे माझी वसुंधरा अभियान ३.० अंतर्गत मागील वर्षाच्या तुलनेत स्पर्धेअंतर्गत उल्हासनगर महानगरपालिकेचे गुणांकन २९ वरुन १२ वर आले आहे. याद्वारे उल्हासनगर शहराचे पर्यावरण चांगले ठेवण्यासाठी चांगले काम होत असल्याची दखल घेत वरीलप्रमाणे मा. मंत्री महोदयांच्या हस्ते पारितोषिक देवुन गौरविण्यात आल्याने उल्हासनगर महानगरपालिकेची प्रतिमा महाराष्ट्र राज्यात उंचावलेली आहे.

उल्हासनगर शहराचे पर्यावरण चांगले ठेवण्यासाठी मा. आयुक्त, अजिज शेख, अति. आयुक्त ( पर्यावरण ) डॉ. करूणा जुईकर, अति. आयुक्त (शहर) श्री. जमीर लेंगरेकर, उपायुक्त (पर्यावरण/आरोग्य) डॉ. सुभाष जाधव, उपायुक्त (मुख्यालय) श्री. अशोक नाईकवाडे, यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरण विभागप्रमुख, सौ. विशाखा सावंत तसेच पर्यावरणाशीसंबंधित इतर विभाग मुख्यत्वे शहर अभियंता/उपअभियंता, सार्व. बांधकाम विभाग, मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, कार्यकारी अभियंता (विदयुत), कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा), सहा. सार्व. आरोग्य अधिकारी, मुखय स्वच्छता निरीक्षक, वाहन विभागप्रमुख, सिस्टीम ॲनालिस्ट, उद्यान अधिक्षक अशा सर्व विभागांच्या कामाच्या माध्यमातुन उल्हासनगर शहराचे पर्यावरणाविषयी चांगले काम होत आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेकडून उल्हासनगर शहराचे पर्यावरण चांगले ठेवण्यासाठी होत असलेल्या चांगल्या कामाची दखल घेत महानगरपालिकेस पारितोषिक देवुन मा. मंत्री महोदयांच्याहस्ते गौरविण्यात आल्याचा अभिमान आहे. अशाचप्रकारे उल्हासनगर शहरातील हवेची गुणवत्ता यापुढेही चांगली राखण्यासाठी शासनाकडून देण्यात येणा-या निधीचा योग्य वापर करून आवश्यक कामे करण्याचा तसेच उल्हासनगर शहरातील नागरीकांना चांगले पर्यावरण देण्याचा महापालिकेचा मानस राहिल.

26/6/23

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत –माहितीस्तव सादर.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका
प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.
१. पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२. सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
सदरची प्रेसनोट उल्हासनगर महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.